दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ३० एप्रिल २०२५ | अंक १३९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

जो खूप प्रवास करतो, त्याला खूप ज्ञानही लाभते.
टी. फुलर.

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक
दिल से दिल तक
1st TIME TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# आधी आर्मीला ग्रीन सिग्नल, आता संपूर्ण जगाचे लक्ष मोदींच्या निवासस्थानाकडे, ३ प्रमुख नेत्यांची हायलेव्हल मिटिंग!!



पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर राजधानी दिल्लीत मोठ्या घडामोडी घडत आहेत. येथे रोज अनेक महत्त्वाच्या बैठका होत आहेत. आजदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी अनेक बैठका पार पडल्या. या बैठकात मोदी यांनी सैन्याला पाकिस्ताला प्रत्युत्तर देण्यासाठी वेळ आणि टार्गेट ठरवण्यास सूट दिल्याचं सांगितलं जात आहे. आता या निर्णयानंतर मोदी यांच्या निवासस्थानाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार येथे मोदी यांच्यासह भारतातील तीन प्रमुख नेत्यांत आणखी एक बैठक होत आहे. नरेंद्र मोदी-अमित शाहा, राजनाथ सिंह यांच्यात बैठक मिळालेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा आणि संरक्षणंत्री राजनाथ सिंह यांच्यात एक बैठक होत आहे. मोदी यांनी काही वेळापूर्वी भारताच्या तिन्ही सैन्यदलाचे प्रमुख, केंद्रीय संरक्षणंत्री तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्यासोबत एक बैठक घेतली. ही बैठक संपताच अमित शाह हे मोदींच्या निवासस्थानी पोहोचले आहेत. आता मोदी, शाहा आणि राजनाथ सिंह यांच्यात उच्चस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीत कोणत्या विषयांवर चर्चा होणार? तसेच बैठकीअंती काय ठरणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. मोहन भागवत मोदींच्या भेटीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवतही नरेंद्र मोदी यांच्या भेटीला पोहोचले आहेत. त्यामुळे मोदी आणि मोहन भागवत यांच्यातही आता वेगवेगळ्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान मोहन भागवत मोदींना भेटायला नेमकं का गेले? हे स्पष्टपणे समजू शकलेले नाही. मात्र याआधी मोदी यांनी सैन्यदलाच्या प्रमुखांसोबत बैठक घेतल्यानंतर मोहन भागवत यांच्या या भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## भारतीय सेनेकडून युद्धाभ्यास चालू

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारतीय सेनेच्या तयारीचाही आढावा घेत आहेत. याआधीच केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आमची सेना पाकिस्तानला उत्तर देण्यास सज्ज आहे, असे सांगितले आहे. त्याचाच एक भाग म्हणून भारतीय सेनेकडून युद्धाभ्यास चालू आहे. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळेच मोदी आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये होत असलेल्या या बैठकीला मोठे महत्त्व आले आहे.

## मोदी, सैन्यदल प्रमुखांच्या बैठकीत काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार नरेंद्र मोदी आणि भारताच्या तिन्ही सैन्यदल प्रमुखांची एक बैठक पार पडली. या बैठकीत राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हेदेखील उपस्थित होते. या बैठकीत मोदी यांनी तिन्ही सैन्यदलांवर पूर्ण विश्वास असल्याचं सांगितलं आहे. तसेच पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर द्यायचं असेल तर सैन्याने टार्गेट ठरवावे आणि वेळ निश्चित करावी. या निर्णयात कोणीही हस्तक्षेप करणार नाही, असं मोदी यांनी सैन्याला सांगितलं आहे. त्यामुळे आता भारतीय सैन्य आगामीक काळात नेमका काय



दिल्लीत महत्त्वाची बैठक, मोदी फायनल कॉल घेणार?

# राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिक वापरास सक्त मनाई ध्वजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

बीड दि. 29 :- राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम आदी समारंभाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा वापर करताना, भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरण्यात येऊ नयेत. यासाठी सर्व शासकीय यंत्रणांसह शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटना आदीसह नागरीकांनी दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

दरवर्षी 26 जानेवारी, 15 ऑगस्ट, 1 मे तसेच मराठवाडयात 17 सप्टेंबर आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा सामन्यांच्यावेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. अशा कार्यक्रमात प्लास्टिकेचे ध्वज वापरल्याने, कार्यक्रमानंतर फाटलेले कागदी तसेच प्लास्टिकचे ध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात, पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा उचीत सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वज संहितेच्या कलम 1.2 ते 1.5 मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत स्पष्ट तरतूद आहे. ध्वजसंहितेच्या कलम 2.2 (x) मधील प्रयोजनासाठीच कागदी राष्ट्रध्वज वापरता येतो. प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत ध्वजसंहितेमध्ये उल्लेख नमूद नाही. याचा विचार करता ध्वजसंहितेच्या तरतुदींचे पालन करावे. तसेच कोणीही प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करु नये.

प्लास्टिक व कागदी राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्यासाठी जनजागृती करण्याकरिता जिल्हा व तालुका पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कार्यक्रम पार पडल्यानंतर खराब झालेले, माती लागलेले राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तालुका व जिल्हा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेस सुपुर्द करण्याचे अधिकार अशासकीय संस्था तसेच इतर संघटनांना देण्यात आले आहेत. त्यांनी असे खराब झालेले, माती लागलेले ध्वज जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्याकडे सुपुर्द करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी सुपूर्द केले असे ध्वज गोणी किंवा कपडयामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावे. अशाप्रकारे बांधलेले राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक नष्ट करण्याबाबत परिपत्रकात व ध्वजसंहितेत स्पष्ट सूचना आहेत. त्यानुसार खराब झालेल्या ध्वजाची विल्हेवाट लावण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर केलेल्या उपरोक्त व्यवस्थेबाबत सर्व शासकीय कार्यालये, अर्धशासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरणे व शैक्षणिक संस्था यांनी योग्य ती दखल घ्यावी व कार्यवाही करावी, असेही गृह विभागाने म्हटले आहे.

00000

## पशुसंवर्धन विभाग बीडच्या वतीने 2 मे रोजी एक दिवसीय कार्यशाळा

बीड दि. २९ :- राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा दिनांक ०२ मे २०२५ रोजी स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर परळी वै. येथे सकाळी ०९.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत पंकजा गोपीनाथराव मुंडे, मंत्री पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरणीय बदल यांच्या उपस्थितीमध्ये करण्याचे नियोजन आहे. या कार्यक्रमास बीड जिल्हयातील बँकेचे प्रतिनिधी, पशुपालक/शेतकरी यांच्यात थेट चर्चा आयोजित केलेली आहे. तरी बीड जिल्हयातील जास्तीत जास्त पशुपालक/शेतकरी यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन पशुसंवर्धन विभाग बीड यांच्या मार्फत करण्यात आलेले आहे. तसेच प्रस्तुत कार्यक्रमास जिल्हयातील काही निवडक बँक अधिकारी व प्रगतीशिल पशुपालक यांना मा. मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## घरकुल ऑनलाईन सर्व्हेसाठी मुदतवाढ द्या:- सुजीत शिंदे

नेकनूर (प्रतिनिधी):- प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिका-यांच्या मार्फत-किंवा स्वत:च्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून बीड जिल्ह्यातील अनेक गावामध्ये सध्या शासनाकडुन प्रत्येकाला हक्काचे घर मिळणार आहे.तसे शासनाकडुन लाभार्थ्यांना सेल्फ सर्व्हे करण्यास शासनाने अँप उपलब्ध करुन दिले आहे.परंतू



लाभार्थी हे सेल्फ सर्व्हे करतांना सदरील अँप मध्ये माहिती साठविताना दिरंगाई होत आहे.हा सर्वे करताना अनेक अडथळे निर्माण होत आहे. त्यामुळे सेल्फ सर्व्हे जिकीरीचे जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लाभार्थी नागरिक हताश होत आहेत. या सर्वेची अंतिम तारीख 30 एप्रिल पर्यंत दिली आहे,परंतू अद्याप पर्यंत अनेक लाभार्थी नागरिकांचे ऑनलाईन सेल्फ सर्वे झालेला नाही.ह्या सर्वे पासून अनेक नागरिक वंचित राहतील तरी शासनाने या सर्वेला मुदतवाढ द्यावी अशी मागणी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन

जालना/प्रतिनिधी

जालना येथील पानवेस कुंभार गल्ली येथे दिगंबर काका पेरे यांच्या निवासस्थानी ज्येष्ठ संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथी निमित्त गोरोबाकाका महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले व आरती केली .यावेळी विधानसभा



प्रमुख भास्कर आबा दानवे. शिवसेना शहर प्रमुख विष्णूभाऊ पाच फुले. नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष मा श्री अंकुश शेठ राऊत. संजय डोंगरे. कुंभार समाज मराठवाडा अध्यक्ष दिगंबर मामा पेरे जालना. जिल्हाध्यक्ष तथा मौजपुरी सरपंच बद्रीनारायण भसांडे .युवा जिल्हाध्यक्ष कृष्णा संत्रे. दौलत भुतेकर.अरुण पेरे. लोकेश पेरे. अशोक गोरखोदे .राजू पल्लवे .गौरव गोरखोदे व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

# खासदार बजरंग सोनवणे यांच्याकडून बाबुराव धारक यांच्या स्वादिष्ट रेवडी च कौतुक!

## श्री खंडेश्वर केटर्सच्या उत्कृष्ट चवीमुळे धारक कुटुंबाची ओळख!

कुसळंब | प्रतिनिधी यात्रा, उत्सव, लग्नसराईमध्ये आपल्या वेगळ्याच कलेतून नागरिकांच्या तोंडाची चव ओळखून स्वादिष्ट खाणं बनवण्याची कला धारक कुटुंबियांकडे परंपरेने आल्याने त्यामध्ये अधिक भर टाकण्याचं काम बाबुराव धारक यांच्या कडून होत असल्याने अनेकांकडून त्यांचं कौतुकही होत आहे. कुसळंब येथे एका लग्न समारंभाच्या निमित्ताने खासदार बजरंग सोनवणे आले असता त्यांना बाबुराव धारक यांनी रेवडी भेट दिली त्यातील रेवडी खाऊन खासदार बजरंग सोनवणे यांनी धारक यांचं कौतुक केलं आणि पुन्हा एकदा खायला येऊ असं देखील सांगितलं.. कुसळंब पाटोदा तालुकाच नव्हे तर जिल्हाभरामध्ये आपल्या स्वादिष्ट यात्रेतील रेवडी गुडीशेव जिलेबी बालुशाही शेव चिवडा पेढ्याची चव ही जिल्हाभरामध्ये पसरली आहे. धारकांनाच नाव आणि खंडेश्वर केटरर्स म्हटलं की स्वादिष्ट पदार्थाचं ठिकाण म्हणून ओळखलं जातं. खंडोबाच्या दर्शनासाठी येणारे जाणारे भक्त देखील आवर्जून त्यांना पार्सल घेऊन जाण्यासाठी सर्वच स्वादिष्ट पदार्थ बनवायला सांगतात. त्याचबरोबर यात्रेमध्ये देखील नागरिकांची दुकानावर झुंबड पाहायला मिळते. धारक कुटुंबीयांचा परंपरेने सुरू असलेला केटर्सचा व्यवसाय आता आपल्या चवीने ओळखला जाऊ लागला आहे. त्यांच्या स्वादिष्ट पदार्थांची चव खासदार आणि ही चाखली आणि धारक कुटुंबीयांचं कौतुक केलं. पुन्हा एकदा खायला येऊ असं देखील सांगितलं. यावेळी माजी सरपंच शिवाजी पवार मेजर, सामाजिक कार्यकर्ते अतुल अण्णा शेलार, सरपंच किरण पवार, यांच्यासह गावातील ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. खासदार साहेबांना यात्रेचे निमंत्रण होतं ते आज पूर्ण झालं —बाबुराव धारक आमच्या कुटुंबियाकडे परंपरेने आलेला व्यवसाय आज उत्कृष्ट चवीमुळे ओळखला जात आहे. पाटोदा सह संपूर्ण बीड जिल्हा नगर जिल्ह्यातील बरेचसे ना... खंडोबा दर्शन गहिनीनाथ गड या ठिकाणी दर्शनासाठी येतात आणि आल्यानंतर आमच्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद ...ल्यानंतर कौतुकही करतात बरं वाटतं आज बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आमच्या स्वादिष्ट पदार्थांची चव चाखली आणि कौतुक केलं बरं वाटलं यात्रेला निमंत्रण दिलं होतं त्यांना वेळअभावी येता आलं नाही आज ते पूर्ण झालं बरं वाटलं...



—बाबुराव आण्णा धारक मालक खंडेश्वर केटर्स कुसळंब.

## संपादकीय

## साडेतीन मुहूर्तपैकी असणारी अक्षय फलदायी अक्षयतृतीया.





अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तापैकी असणारा अतिशय शुभ मुहूर्त. भारतामध्ये हिंदू पंचांगानुसार वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षाच्या तृतीयेला अक्षय तृतीया म्हणतात. अक्षय म्हणजे कधीही नाश न पावणारा कधीही न संपणारा असा त्याचा अर्थ. त्यामुळेच असे समजले जाते या दिवशी जर दान दान वाढते, ज्ञान दिल्याने ज्ञान वागते. असे करणाऱ्याच्या साठ्यांमध्ये वाढ होते. जितके ते दुसऱ्यांना दिले जाते त्यापेक्षा जास्त त्याला प्राप्त होते. असे या अक्षय तृतीयेचे वैशिष्ट्य. अक्षय तृतीया हा सण हिंदू धर्माप्रमाणेच जैन धर्मातही साजरा केला जातो. अक्षय तृतीयेला याव्यतिरिक्त आखातीज, आखाजी अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. असे मानले जाते अक्षय तृतीयेच्या दिवशीच भगवान विष्णू यांनी परशुरामाचा अवतार घेतला होता. तसेच त्रेता युगामध्ये पवित्र गंगा नदीला भगीरथांनी पृथ्वीवर याच दिवशी आणले. अशी अनन्यसाधारण अशी महती असणाऱ्या या अक्षय तृतीयेच्या दिवशी कुठलाही मुहूर्त न पाहता प्रत्येक शुभ कार्य करता येते. त्यामध्ये गृहप्रवेश असेल, वाहन खरेदी असेल, सुवर्ण खरेदी इत्यादी. या दिवशी माता अन्नपूर्णा देवीची ही पूजा केली करतात. पवित्र ग्रंथ व्यासमुनींनी याच अक्षय तृतीयेच्या दिवशी लिहिण्यास सुरुवात केली होती. त्यात असणारे महाराज युधिष्ठिर यांना अक्षयपात्र प्राप्त झाले होते. या अक्षय पात्राची वैशिष्ट्य यातून कितीही दान केले तर ते कधीच संपत नव्हते. याचा उपयोग युधिष्ठिरानी गोरगरीब लोकांना अन्नदान करण्यासाठी केलेला होता. भगवान विष्णूंच्या श्रीकृष्ण अवतारातील श्रीकृष्ण सुदामा यांची भेट सर्वपरिचित आहे. ही भेट ही अक्षय तृतीयेच्या दिवशीच झाली असे पुराणात आहे. सुदामाने आपल्या गरिबीत असणारे पोहे भगवान श्रीकृष्णाला दान दिल्यानंतर श्रीकृष्णांनी सुदामाचे सर्व दारिद्र्य नष्ट करून त्याच्या झोपडीचे सुंदर ऐश्वर्या संपन्न अशा महालांमध्ये परावर्तन केले होते. या दिवशी देवाधिकांच्या पूजेप्रमाणेच आपल्या पूर्वजांचे ऋण फेडण्याचाही पवित्र दिवस समजले जाते. म्हणून या दिवशी आपल्या पित्रांचे पूजन करून त्यांच्या स्मरणार्थ अन्नदान केले जाते. या दिवशी केलेले कार्य दानधर्म अक्षय राहते नाश पावत नाहीत. त्यामुळे या दिवशी दान करून शुभ कार्य केले जाते. नवीन वस्तू, वास्तू खरेदी करण्यास येतात. अशा या अखंड आणि अक्षय अशा शुभ मुहूर्तावर प्रत्येकाने चांगलं कार्य करून चांगले फळ मिळण्यासाठी या वर्षीच्या अक्षय तृतीयेच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

भानुदास सुखदेव शेवाळे
९३२५२९७७०१

# TECH- वारी : डिजिटल प्रशासनाकडे महाराष्ट्राची आत्मविश्वासपूर्ण वाटचाल”

मुंबई, दि. 29 : सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने “TECH वारी - टेक लर्निंग वीक” या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात सर्वस्तरांवरील कर्मचाऱ्यांना डिजिटल युगासाठी आवश्यक ज्ञान, साधने आणि विचारसरणीने सज्ज करणारा हा उपक्रम आहे. ५ ते ९ मे, २०२५ दरम्यान मंत्रालय, मुंबई येथे TECH-वारी हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे. हा प्रशिक्षण उपक्रम महाराष्ट्राच्या प्रशासनात होणाऱ्या डिजिटल परिवर्तनातील आघाडीचा ठरणार आहे. वारी या सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या संकल्पनेवर आधारित TECH-वारी ही समर्पण व सामूहिक प्रगतीचे प्रतीक आहे, जे शासनाच्या कर्मचाऱ्यांमध्ये निरंतर शिक्षण व सहयोगाची भावना जागृत करते. या सामूहिक प्रवासाचा उद्देश म्हणजे कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञान आत्मसात करून अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासनाकरीता सक्षम करणे हा आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञानाद्वारे सक्षमीकरण TECH-वारीचा गाभा म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान सर्व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सहजसोपे आणि समजण्याजोगे बनवणे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज् (IoT), सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स अशा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाद्वारे हे जटिल विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगितले जातील. प्रशासन सक्षमीकरण, सेवा प्रदान व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी त्याचा कसा वापर करता येईल हे सांगितले जाईल. केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे तर मानसिक व भावनिक आरोग्यही महत्त्वाचे आहे, सर्वांगीण आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी TECH-वारीमध्ये तणाव व्यवस्थापन, संगीत थेरपी, ध्यानधारणा, कार्य-जीवन समतोल या विषयांवर विशेष




सत्रे आयोजित केली आहेत. यामुळे एक संतुलित व सुदृढ शासकीय कर्मचारी वर्ग घडवण्यास मदत होईल. प्रसिद्ध वक्त्यांचा अपूर्व मेळा या कार्यशाळेत सुप्रसिद्ध वक्त्यांचा समावेश असून ‘प्रभावी व तणावमुक्त जीवन’ या विषयावर सुप्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपालदास यांचे ५ मे २०२५ रोजी व्याख्यान होणार आहे. ‘प्रवास पाककृतीचा’या विषयावर ६ मे २०२५ रोजी सुप्रसिद्ध शेफ माधुरा बाचल यांचे व्याख्यान होणार आहे.’आरोग्यपूर्ण जीवनशैली’ या विषयावर रूजता दिवेकर यांचे ७ मे रोजी तर,’जीवन संगीत’ या विषयावर डॉ.संतोष बोराडे यांचे ८ मे रोजी २०२५ रोजी, ध्यान आणि अंतरिक शांती या विषयावर व्याख्यान होणार आहेत. प्रशासनातील तंत्रज्ञान परिवर्तक ‘तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासनाचे परिवर्तन’ या विषयावर सचिव (MeitY) श्री. एस. कृष्णन,’कृत्रिम बुद्धिमत्ता’या विषयावर मुख्य कार्यकारी अधिकारी एआय इंडिया मिशन चे अतिरिक्त सचिव अभिषेक सिंह यांचे,’विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर टेक’या विषयावर निती आयोगाच्या फेलो देबजानी घोष यांचे, ‘भाषा अडथळे दूर करणारे तंत्रज्ञान’या विषयावर डिजिटल इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ नाग यांचे व्याख्यान होणार आहेत. महाराष्ट्र राज्यातील प्रशासनाचे अधिकारी ‘महसूल विभागात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर’या विषयावर महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांचे, ‘स्टार्टअप डेमो डे - महा-राईज प्लॅटफॉर्म’या विषयावर कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, ‘आपत्ती निवारण व पुनर्वसनात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा वापर’या विषयावर नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, ‘कुंभमेळ्यात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा वापर’ या विषयावर नाशिकचे विभागीय आयुक्त प्रविण गेडाम यांचे, ‘नागरी क्षेत्रात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा वापर’ या विषयावर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंग यांचे, ‘वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर’ या विषयावर कृषी आयुक्त सुरज मांढरे यांचे तसेच महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास नाईक यांचे व्याख्यान होणार आहे. नॅस्कॉमचे विशेषज्ञ ‘कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)’ या विषयावर एलटीआय माईंडट्रीचे ‘इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT)’ या विषयावर एलायड डिजिटलचे रवींद्र देशपांडे यांचे ,’ब्लॉकचेन’ या विषयावर बेकर ह्युजेस या विषय लौकिक रगजी यांचे ,’सायबरसुरक्षा’ या विषयावर नॅस्कॉमचे प्रसाद देवरे, सुक्रित घोष यांचे,’स्मार्ट मिटिंग्स कशा घ्याव्यात’ या विषयावर झूमचे शैलेश रंगारी व मेहर उल्लीपालेम यांचे, ‘डिजिटल जागरूकता’ या विषयावर मास्टेकचे प्राजक्ता तळवलकर, राहुल मुळे यांचे व्याख्यान होणार आहेत. कर्मयोगी भारत हे डिजिटल शिक्षणासाठी मुख्य भागीदार,नॅस्कॉम हे स्टार्टअप सहयोगी व तंत्रज्ञातील विशेषज्ञाचे भागीदार, इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट - पोषण व आरोग्य संवर्धनासाठी पाककला सत्र या सर्वांचा या प्रशिक्षण उपक्रमात सहभाग असणार आहे. आजीवन शिक्षणाचा प्रसार डिजिटल इंडियाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत, TECH-वारीने निरंतर शिक्षण संस्कृतीला चालना दिली आहे. आयगॉटसारख्या डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मचा वापर वाढवण्यासाठी अधिकारी व कर्मचारी प्रेरित केले आहेत. महाराष्ट्रातील 5 लाख कर्मचारी आयगॉटवर आहेत व 10 लाखांहून अधिक कोर्स पूर्ण केले आहेत. प्रशासनातील नवोपक्रमांना चालना TECH-वारी हे सिद्ध करते की, केवळ खासगी क्षेत्रच नाही तर शासनही नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारून परिवर्तन साधू शकते. सर्व स्तरांवरील कर्मचाऱ्यांना नवीन कल्पना आणि डिजिटल उपायांमध्ये सहभागी करून महाराष्ट्र एक अभिनव, कार्यक्षम व लोकाभिमुख प्रशासन घडवत आहे. नवसंधी निर्माण करणारा उपक्रम TECH-वारी हे केवळ शिक्षणापुरते सिमित नसून, उद्योजकता व नाविन्यपूर्ण उत्पादने यांना संधी देणारे हे व्यासपीठ आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या सहकार्याने “महाराईज-स्टार्टअप पिचिंग” हे सत्र आयोजित करण्यात आले आहे. ज्यात महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह 2025 मधून विजयी ठरलेल्या 24 स्टार्टअप्सना प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आपले उत्पादने व सेवा सादर करण्याची संधी मिळणार आहे. भविष्याकडे निर्धारपूर्वक पाऊल TECH-वारीच्या माध्यमातून महाराष्ट्र ठामपणे सांगतोय - आपण फक्त बदलाचा स्वीकार करत नाही, तर बदलाचे नेतृत्व करतो आहोत. प्रत्येक कर्मचारी हा परिवर्तनाचा वाहक आहे आणि एका तंत्रसज्ज, प्रगत व संवेदनशील महाराष्ट्रासाठी आपली जबाबदारी पार पाडत आहे.

# ‘वेव्हज 2025’माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ भारत सृजनशील महासत्ता होणार

मुंबई, दि. 28 : देशातील माध्यम व मनोरंजन क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या ‘वेव्हज 2025’ या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. 1 मे रोजी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वांद्रे कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. 1 ते 4 मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे. मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ या कालावधीत ‘वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही या परिषदेत सहभाग असणार आहे. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः मुंबईला हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर म्हटले जाते. मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई देशात अग्रगण्य शहर आहे. गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणुकीतही आघाडीवर आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई आघाडीवर राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चा उद्देश आहे. या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 1 मे 2025 रोजी करणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे २०२५ रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र ‘ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी’कडे वाटचाल बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर ‘क्रिएटर हब’ म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न ‘वेव्हज 2025’ च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील 100 पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला दिशा देणारा मंच ‘वेव्हज 2025’ ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन (M&E) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे. परिषदेतील एक विशेष आकर्षण ‘WAVES बाजार’ ‘WAVES बाजार’ एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील. परिषदेत




काय असणार? परिषद सत्रे जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील. मीडिया मार्केटप्लेस भारताच्या माध्यम व मनोरंजन (M&E) क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन. तंत्रज्ञान प्रदर्शन नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो. सांस्कृतिक कार्यक्रम भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम. जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी ‘वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल ॲण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES) 2025’ भारताला जागतिक पातळीवर ‘कंटेंट सुपरपॉवर’ म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्ण संधी ठरणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबईने क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे. ‘वेव्हज 2025’ ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे. ‘वेव्हज 2025’ : का आहे ही परिषद खास? भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (Media & Entertainment - M&E) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. OTT, ॲनिमेशन, गेमिंग, VFX, चित्रपट, संगीत, आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकात विक्रमी प्रगती केली आहे. FICCI-EY रिपोर्टनुसार, 2024 मध्ये भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योगाची किंमत $28 अब्जच्या पुढे गेली असून, 2025 पर्यंत तो $34 अब्ज गाठेल असा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर ‘वेव्हज 2025’ ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून, भारतातील सृजनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य, आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे. भारत सृजनशील महासत्ता होण्याच्या वाटेवर भारतात सध्या दरवर्षी 2,000 पेक्षा अधिक चित्रपट तयार होतात, ज्यात 20 पेक्षा अधिक प्रादेशिक भाषा समाविष्ट असतात. OTT प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने ‘कंटेंट एक्स्पोर्ट हब’ होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. WAVES 2025 या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतीशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, जिथून भारताची माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील भविष्यातील दिशा ठरवली जाईल. ऑस्कर, कान्स, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोसच्या धर्तीवर वेव्हज् चेही दरवर्षी आयोजन ‘वेव्हज्’ ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. या परिषदेस एक कायमस्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्हज याचेही दरवर्षी आयोजन केले जाणार आहे. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे. वेव्हज परिषदेस 100 पेक्षा जास्त देश होणार सहभागी सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मनोरंजन क्षेत्रात क्रियेटिव्ह ईकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज परिषदेस 100 पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी 20 पेक्षा खूप मोठा असणार आहे. वेव्हज समिटची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे घटक: □ ‘क्रिएट इन इंडिया’ वर भर: मेक इन इंडिया’ पाठोपाठ आता ‘क्रिएट इन इंडिया’ ही नवी संकल्पना WAVES समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल. □ सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ: भारतातील प्रादेशिक भाषांतील कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी. □ ग्लोबल सहयोग आणि भागीदारी: Netflix, Amazon, Disney+, Sony Pictures यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील. □ तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगम: एआय, वर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव्ह कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा. □ धोरणात्मक चर्चासत्रे: धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी. □ क्रिएट इन इंडिया चॅलेंज - जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज 2025 मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी ‘वेव्हज’ हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे. □ वेव्हेक्स 2025 - हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणार असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल. □ वेव्हज बाजार: चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते. □ मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे - उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी. 00000

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ३० एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# शब्दश्री विलास देवळेकर यांना पुरस्कार जाहीर !




जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि श्रेष्ठ साहित्यिक व कवी तसेच, अक्षरावरून कविता आपल्या म्युझिकल इको साऊंड सिस्टीम मध्ये सादर करणारे अक्षरश्री विलास देवळेकर यांना नुकताच 'मासिक कोकण दीप' यांच्या २३व्या वर्धापन दिनानिमित्त "कोकण दीप साहित्यिक भूषण पुरस्कार-२०२५" जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रांतून देवळेकर यांच्यावर अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.



विधानपरिषद सदस्य आमदार तथा शिवसेनेचे उपनेते मा.सचिनजी अहिर हे आज परळी - अंबाजोगाई दौऱ्यावर आले असता त्यांचा स्वागतसत्कार शिवसेनेचे जिह्लाप्रमुख उह्लास गिराम यांनी केला. यावेळी प्रभु वैजिनाथला अभिषेक करून पुजा करण्यात आली. उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधला यावेळीउपजिह्लाप्रमुख नारायण दादा सातपुते, शिवाजीराव कुलकर्णी, भाई संजय महाद्वार डॉ. नयनाताई शिरसाठ, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, भोजराज पालेवाल, अभिषेक दिवे, राजेश विभुते, सतीश परदेशीं, दिलीप पवार यांचा सह मोठया संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर

बाराव्या शतकात
बीज क्रांतिकारी
बाल बसवन्नांचा
निर्णय कल्याणकारी...१

वृतबंधविधी त्यागुनी
बालपणी सोडले घरदार
बालमन होते आक्रंदले
स्त्रीला का नसे हा अधिकार?..२

स्त्री पुरुष समानता हवी
दयाविना धर्म निराधार
पूजेत अनेकविध देव नको
एकच ईश्वर निराकार..३

कायकवे कैलास तत्त्व
आचरणी ठेवावे
सांगुनी गेले बसवराज
आत्मलिंगास भजावे..४

सत्य वचन अंतरात
त्यासी मिळे मोक्ष
प्रभूची सारी लेकरे
अंतर्मन देई साक्ष..५

अनुभव मंडप संकल्पना
संसदिय संरचना
स्त्री-पुरुष दोघास मान
निर्णय सहभाग नवकल्पना... ६

**सौ. विद्या मलवडकर (विद्याराणी )**
**तारगाव सातारा**

# मुंबईत होणारी वेव्हज परिषद मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी दावोस ठरणार: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्र्यांकडून परिषदेच्या तयारीची पाहणी

मुंबई, दि.२९: मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे दरम्यान 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा (वेव्हज) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या समिटच्या तयारीची पाहणी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. वेव्हज २०२५ परिषद मुंबईत होतेय हे महाराष्ट्रासाठी गौरवास्पद आहे. जागतिकस्तरावर मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी ही परिषद 'दावोस' ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. दुपारी तीनच्या सुमारास उपमुख्यमंत्री श्री.



शिंदे यांनी जिओ वर्ल्ड सेंटरला भेट दिली. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, उद्योग विभागाचे प्रधान सचिव श्री.अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसु आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी परिषदेबाबत सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाला मिळाले ही अभिमानाची बाब असून असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे असे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टीतून ही परिषद साकार होत आहे. विशेष म्हणजे प्रधानमंत्री श्री. मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. भारत जगात आघाडीवर आहे हे सिद्ध करण्यासाठी ही परिषद महत्वाची असून मुंबई हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे तसेच मिडिया आणि मनोरंजनाचे हे केंद्र असल्याने या परिषदेमुळे मनोरंजन क्षेत्राला तांत्रिकदृष्ट्या नवी ओळख मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. या परिषदेमुळे आंतरराष्ट्रीय स्टुडिओज, प्रोडक्शन हाऊसेस, टेक कंपन्यांची भागीदारीची याची दारे खुली होतील असेही ते म्हणाले.



गुरुवार 1 मे रोजी महाराष्ट्र दिनी मुख्य ध्वजारोहण सोहळा येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर होणार आहे या ठिकाणच्या पूर्व तयारीची पाहणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज सायंकाळी केली.

## श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी, गंगासागर एक धाम तिर्थयात्रा यशस्वी केल्याबद्दल शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचा हृद्य सत्कार सोहळा संपन्न

लिंबागणेश:- ( दि.२९) श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यात्रा सत्संग निमित्ताने श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी, गंगासागर एक धाम तीर्थ यात्रा,(ओडीसा )भगवान श्री राम लल्ला जन्मभूमी अयोध्या ( उत्तर प्रदेश) तिर्थ यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात यांनी यात्रेचे आयोजक श्रीगुरू ईश्वर बाबा भारती बेलेश्वर संस्थान,बेलगावचे मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन महाराजांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी तर सूत्रसंचालन हरिओम क्षीरसागर यांनी केले.यात्रेत सहभागी झालेले गणपत तागड यांनी आपल्या यात्रेदरम्यान अनुभव सांगताना यात्रेकरूंना धार्मिक स्थळांची महती व आस्थेने यात्रेकरूची काळजी घेतली याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याचवेळी ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी समायोजित मार्गदर्शन केले. शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांनी सत्काराला उत्तर देताना हे तिर्थयात्रेचे तिसरे वर्ष असुन गेल्यावर्षी ३०० भाविकां समवेत द्वरकाधाम करण्यात आले होते.यावर्षी ५०० भाविकांचा सहभाग ९ स्लिपर कोच गाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. दि.१२ एप्रिल रोजी बेलेश्वर संस्थान येथुन प्रस्थान करून मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर, उज्जैन येथील महाकाल ज्योतिर्लिंग तसेच उत्तर प्रदेश प्रयागराज त्रिवेणी संगम स्नान ,, अयोध्या शरयु नदी स्नान, श्रीराम जन्मभूमी मंदिर दर्शन, हनुमान गढी दर्शन वाराणसी येथे गंगानदी स्नान,काशि विश्वनाथ



मंदिर दर्शन, कालभैरव मंदिर दर्शन,८४ घाटांचे दर्शन, बिहार येथील बौद्ध गया गौतम बुद्ध स्मारक, पश्चिम बंगाल येथे गंगा सागर संगम, कपिल मुनी आश्रम,ओडीसा मधील जगन्नाथ पुरी (चारधाम पैकी एक),कोणार्क सुर्य मंदिर दर्शन, भुवनेश्वर लिंगराम मंदिर दर्शन, महाराष्ट्रातील रामटेक येथील श्रीराम मंदिर दर्शन,शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराज समाधी दर्शन आदि तिर्थक्षेत्रांचे दर्शन करून दि.२६ एप्रिल रोजी बेलेश्वर संस्थान बेलगाव याठिकाणी समारोप करण्यात आला.भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणावर भाविकांच्या सहकार्याने धार्मिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी शांती ब्रम्ह तुकाराम महाराजांची सजवलेल्या रथातून मिरवणूक काढत सुवासिनींनी औक्षण करत लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर मंदिरापर्यंत आतिषबाजी करत मिरवणूक काढण्यात आली. शेवटी आभार प्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात,महादेव कुदळे, दादा गायकवाड, अँड . गणेश वाणी,पांडुरंग वाणी,संतोष भोसले,संजय घोलप,वरद जोशी, चेतन कानिटकर, गणेश लिंबेकर, आदि उपस्थित होते.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समस्या सोडवण्यासाठी सर्वतोपरी मदत करणार- उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

मुंबई, दि. 29:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राज्यात विविध इमारतींची कामे सुरु असून ही कामे पुढील पन्नास वर्षांचा विचार करुन दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आज दिल्या. तसेच वक्फ मंडळासमोरील समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

राज्य वक्फ मंडळाशी संबंधित विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, बीडचे जिह्लाधिकारी विवेक जॉनसन (दूरदृश्य प्रणालीद्वारे),छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद तसेच विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यातील मुस्लिम बांधवांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य सेवा व इतर आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी सरकार कटिबद्ध आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या गरजा लक्षात घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. समाजातील युवकांना रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील.

या बैठकीत वक्फ मंडळाच्या संपत्ती व्यवस्थापन, निधी वितरण, शिक्षण व इमारत प्रकल्पांशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागांना कार्यवाहीसाठी सूचना देत वक्फ मंडळाच्या समस्या दूर करण्यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले.

*****

## लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला भिषण आग; २ तासानंतर अग्निशामक दलाला आग विझविण्यात यश :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२९ ) बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या अडीचशे वर्षांपूर्वीचा ४-५ पिढ्यांचा लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणा-या वटवृक्षाला आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी आग लागली. डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी बीड नगरपरीषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क साधुन दुर्दैवी घटनेची कल्पना दिली.अर्ध्यातासात बीड नगर परीषदेचे अग्निशामक दलाचे रमेश आदमाने,अक्षय नखाते आणि वाहन चालक अनिकेत कपाळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. २ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग विझविण्यात यश आले.दरम्यान पाणी संपल्याने लिंबागणेश येथील गावाला टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या दादाराव येडे यांनी विनामूल्य आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांना कळल्यानंतर वनविभागाचे दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील जवळपास अडीचशे वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला आज सकाळी ९ च्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांनी याठिकाणी गर्दी केली होती. आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण केले. आगीत वटवृक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व विक्रांत वाणी यांनी बीड अग्निशामक दलाला तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोटो आणि व्हिडिओ पाठवुन वडाला लागलेल्या आगीची कल्पना दिली. या झाडांवर वास्तव्यास असलेल्या पक्षांची घरटी आगीत जळून खाक झाली. मानवी निष्काळजीपणामुळे आगीच्या घटनेत वाढ :- डॉ.गणेश ढवळे उन्हाची तिव्रता वरचेवर वाढत चालली आहे. ग्रामीण भागात ग्रामस्थांनी कचरा व शेतकऱ्यांनी खोडवा पेटवण्याच्या घटनांमुळे वृक्ष आगीत होरपळून जात आहेत. ग्रामस्थांनी वारंवार आवाहन करूनही वृक्षांचे गांभीर्य लक्षात येत नसल्याचे आजच्या घटनेवरून दिसून येत आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी प्रत्येक माणसाने वृक्ष लागवड,वृक्ष संगोपन आणि आगीपासून संरक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे वृक्षप्रेमी डॉ.गणेश ढवळे यांनी आवाहन केले आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# कामगार दिनाच्या पूर्वसंध्येला उपेक्षित,दुर्लक्षित कामगारांना "मानवी दिलासा पुरस्कार " प्रत्यक्ष कामाच्या जागी जाऊन..

पिंपळे गुरव - दिलासा संस्था आणि मानवी हक्क संरक्षण जागृती या संस्थांच्या वतीने एक मे कामगार दिनाच्या व महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला उपेक्षित कष्टकरी कामगारांचा त्यांच्या कामाच्या जागी जाऊन यथोचित सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या घंटागाडीवर काम करणाऱ्या जयश्री म्हस्के, ऊन, पाऊस, थंडीत देखील रोज वृत्तपत्र विक्री करून कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या राऊबाई बिराजदार, पोटासाठी हातगाडीवर केळी विकणाऱ्या अनिता जयस्वाल, पिंपळे गुरव स्मशानभूमीत काम करणारे कामगार विठ्ठल देवकर या कामगारांना त्यांच्या कामाच्या जागी जाऊन " मानवी दिलासा पुरस्कार" शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, साडीचोळी, पोशाख तसेच संस्थेच्या वतीने रोख अर्थसहाय्य देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला काश्मीर पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना आदरांजली वाहण्यात आली.




मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थेचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड यावेळी म्हणाले, "मानवी दिलासा पुरस्कार " दोन्ही संस्थेच्या वतीने प्रथमच शहरात देण्यात येत आहे. सध्या देशात कामगार कायदे हे उद्योगधार्जीने झालेले असून असंघटित कामगारांची संख्या देशात मोठ्या प्रमाणावर झाली आहे त्यांच्या समस्याकडे कोणाचे लक्ष राहिलेले नाही त्यांनाही छोटासा आनंद देण्याचा प्रयत्न दोन्ही संस्थेच्या माध्यमातून केला. कष्टकरी कामगारांना त्यांच्या कामाच्या जागी जाऊन हा पुरस्कार प्रदान करताना आनंद वाटत आहे. माणसाला दिलासा मिळावा. जगण्याची नवी उमेद, प्रेरणा आणि आनंद



मिळावा हीच आमची मनोकामना पुरस्कारा मागची आहे." असे जोगदंड म्हणाले. दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक म्हणाले.. " हातावर पोट भरणारी ही कामगार माणसे. त्यांचा सन्मान ते काम करीत आहेत त्याच जागेवर केला पाहिजे या उद्देशाने उपेक्षित कामगारांना दोन्ही संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सन्मानित केले आहे. विशेष बाब म्हणजे या उपक्रमासाठी अध्यक्ष, प्रमुख पाहुणे नाहीत तर संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते अशा उपेक्षित घटकातील कामगारांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे. प्रतिवर्षी दोन्ही संस्थांच्या वतीने मानवी दिलासा पुरस्कार देण्यात येतील."



याप्रसंगी दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड ,गुणवंत कामगार संगीता जोगदंड, जयश्री गुमास्ते, मीना करंजावणे,आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे, अशोकमहाराज गोरे,तानाजी एकोंडे, नंदकुमार कांबळे, अरुण परदेशी,मुरलीधर दळवी, संजय गमे,निलेश भोसले, हनुमंत पंडित,विनोद कांबळे,दीपा गराडे, पवन रंधे, कविता भोहेर यांची उपस्थिती होते. शामराव साळुंके यांनी आभार मानले.

वृत्तांकन - सुरेश कंक
७५२२९०२७२७

## अक्षय तृतीया !

अक्षय तृतीया हा हिंदू दिनदर्शिकेतील एक दिवस आहे हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वैशाख शुद्ध तृतीया येते. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त.अक्षय तृतीया, पितृ, देव व शुभ तिथी, वसंतोत्सव , दिलोत्सव चंदन यात्रा दिन, अखतारी, आखिती, आख्यातरी अशा अनेक नावाने हा सण भारतात प्रत्येक घरात साजरा केला जातो.या तिथीला केलेले चांगले काम, दिलेले दान अक्षय टिकते. या दिवशी स्वर्गीय माता म्हणून लाल रंगाचा मातीचा घट त्याला केळी व स्वर्गीय पिता म्हणून काळ्या रंगाचा मातीचा घट त्याला करा म्हणतात. यांची पूजा करण्याची प्रथा आहे. या दिवशी ओरिसा व बंगाल प्रांतात परस्परांना चंदनाचे तेल लावून तीन आठवडे चालणाऱ्या चंदन यात्रा या उत्सवाची सांगता करतात.या दिवशी गुजरात मध्ये सागराची पूजा करण्यासाठी सागर उत्सव संपन्न केला जातो.कोकणात या दिवशी कुमारिकांना घरी बोलवून चंदनाचे उटणे लावून शंख फिरवतात पाद्यपूजा करून कैरीचे पन्हे, कोकमचे सरबत पिण्यास देऊन गुलकंद व मोरावळा खाण्यास देतात.अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असल्यामुळे या दिवशी व्यवसायास प्रारंभ करण्याची प्रथा आहे. या दिवशी सोने खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जाते.आपल्या पूर्वजांच्या स्मरणार्थ देह ,नेत्र रक्त, वस्त्र, धन ,जमीन ,विद्या, छत्री, जलकुंभ ,पंखा, विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य दान करण्याची प्रथा आहे.या दिवशी दानधर्म करणे श्रेष्ठ मानले जाते. वैशाख महिन्यात कडक ऊन असते ,त्यासाठी या दिवशी थंड पाणी, कलश, तांदूळ ,हरभरा, दूध ,दही, कपड्यांचे दान करणे शुभ मानले जाते. अक्षय तृतीयेला सत्य, कृत व तेत्रा या युगांचा प्रारंभ झाला असून नर-नारायण , हयग्रिव व परशुराम यांचा जयंती उत्सव साजरा केला जातो. या दिवशी चैत्रगौरीची सांगता महिलांना हळदीकुंकूवाच्या कार्यक्रमाने करतात. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आळी करून लावलेल्या फळबागा भरघोस पीक देतात , अक्षय तृतीयेला लावलेल्या वनस्पतींचा क्षय होत नाही म्हणजेच औषधी वनस्पतींचा तुटवडा भासत नाही ,असेही मानले जाते. आजच्या दिवशी वृक्षारोपण केले जाते.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीचे मशागत अक्षय तृतीयेच्या दिवशी पूर्ण करतात .या दिवशी शेतकरी मृत्तिकेचे पूजन करतो. या दिवशी शेतात बियाणे पेरण्याची प्रथा आहे.

**सौ. शामला पंडित ( दीक्षित )**

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ३० एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय, राज्यात लवकरच सुधारित पीकविमा योजना

नुकत्याच पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. याच बैठकीत सरकारने पीकविम्यासंदर्भातही मोठा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गेल्या काही दिवसांत पीकविमा योजनेत झालेला घोटाळा लक्षात घेता सरकारने आता या योजनेत काही महत्त्वाच्या सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांसाठी लवकरच नवी सुधारित पीकविमा योजना लागू केली जाईल. तशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

पीकविमा योजनेत नेमका बदल काय? देवेंद्र फडणवीस यांनी पीकविमा योजनेत बदल का करण्यात आला? याची सविस्तर माहिती दिली आहे. "आपल्याला कल्पना आहे की मागच्या काळात पीकविमा योजना चालवत होते, त्या योजनेत अनेक घोटाळे पाहायला मिळाले. आपण एका रुपयात पीकविमा योजना चालू केली होती. या योजनेनंतर




लाखो बोगस अर्ज आलेले पाहायला मिळाले. हजारो कोटी रुपयांचा अपव्यय होतो आहे. लोकांनी षडयंत्र केलं. त्यामुळे गरजू शेतकरी वंचित राहतील अशा प्रकारची अवस्था येऊ नये, हा विचार करून पीकविमा योजना सुधारित पद्धतीने लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे," असे फडणवीस यांनी सांगितले.शेतकऱ्यांसाठी आणखी एक मोठी योजना "विमा कंपनीचा लाभ न होता शेतकऱ्यांचा लाभ झाला पाहिजे, हा विचार समोर ठेवून ही योजना नव्याने तयार करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात शेतीच्या क्षेत्रात गुंतवणूक करणं, शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारे मदत करणे यात ट्रॅक्टर, ड्रीप, मल्चिंग पेपर, बीबीएफ अशा वेगवेगळ्या गोष्टींत गुंतवणूक वाढवण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र योजना राज्याच्या मंत्रिमंडळाने पारित केली आहे," अशी माहितीही त्यांनी दिली.

नेमका काय बदल, अद्याप अस्पष्ट सरकारने पीकविमा योजनेत केलेले हे बदल नेमके कसे आहेत? नेमकं काय काय बदलणार? याबाबत अद्याप माहिती समोर आली नाही. मात्र पीकविमा योजनेच्या अंमलबजावणीवेळी नेमकं काय बदललं हे समजणार आहे.

## प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते यांच्या उपस्थितीत आर्यारवी एंटरटेनमेंटचा तिसरा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट पुरस्कार सोहळा संपन्न..!

मुंबई-परेल (प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर) आर्यारवी एंटरटेनमेंटचा तिसरा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट पुरस्कार वितरण सोहळा नुकताच शिशुविकास हॉल, बेस्ट वसाहत, राजकमल स्टुडिओ जवळ, परेल येथे सिने-नाट्य क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी सर्व विजेत्या लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले. प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप कबरे, सही रे सही नाटक फेम विनोदी अभिनेते जयराज नायर, प्रसिद्ध उद्योजक, समाजसेवक, अभिनेते खलील शिरगांवकर, शिर्के प्रतिष्ठानचे अँड सुनिल शिर्के, जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, प्रसिद्ध समाजसेविका सीमाताई पाटील, प्रसिद्ध विनोदी अभिनेते जयवंत भालेकर, कांचन पगारे आदी मान्यवर यांच्या हस्ते सोहळ्याचे दीपप्रज्वलन करून काश्मीरमधिल दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गणेश स्तवनाने झाली. आर्यारवी एंटरटेनमेंटचे महेश्वर तेटांबे यांनी सोहळ्याचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक अनिल सुतार आणि प्रसिद्ध अभिनेता सागर सातपुते यांच्या अस्खलित सूत्रसंचालनाने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. त्याचबरोबर सिनेसृष्टीत अलौकिक कार्य करणाऱ्या सर्वश्री अरुण होर्णेकर, मनोहर आचरेकर, निलांबरी खामकर, प्रदीप कबरे, लक्ष्मण गुरव आणि जयंत घाटे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते समाजभूषण, कलाभूषण, रंगकर्मी, समाजरत्न, युवा उद्योगरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. निवेदक अनिल सुतार आणि सागर सातपुते यांनी लघुपट स्पर्धेचा निकाल जाहीर केला या निकालात कै.भिकाजी महादेव तेटांबे कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ "शाश्वत" (प्रथम विजेता) रोख रक्कम 25 हजार,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, लोकनेते कै.विठ्ठलदादा खाडे आणि कै. सुनीताताई विठ्ठलराव खाडे यांच्या स्मरणार्थ "शूलेस" (द्वितीय विजेता) रोख रक्कम 15 हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, "प्रपोजल" (तृतीय विजेता) रोख रक्कम 10 हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, "चटका" (उत्तेजनार्थ विजेता) रोख रक्कम 5 हजार,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह तसेच इतर काही उत्तेजनार्थ आणि वैयक्तिक पारितोषिके कै.शामराव नारायण व्हटकर, कै. हौसाबाई शामराव व्हटकर, कै गीता आनंदा जाधव यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात आली. तसेच संस्थापक -अध्यक्ष श्री गुरुनाथ तिरपनकर यांच्या जनजागृती सेवा संस्थेच्या माध्यमातून, खलील शिरगांवकर, आणि अँड.सुनिल शिर्के, प्रसिद्ध अभिनेत्री लक्ष्मी मनिष गुप्ता यांच्या माध्यमातून अनेक पुरस्कार प्रदान करण्यात करण्यात आले. या सर्व कार्यक्रमासाठी प्रसिद्ध संकलक आणि दिग्दर्शक राजवीर आनंदा जाधव

## इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रदीप मून सरांचे मार्गदर्शन



गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी जोगेश्वरी पूर्व बांदेकरवाडी येथील श्री समर्थ विद्यालयातील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांना श्रम आणि रोजगार मंत्रालयातून उपसंचालक म्हणून निवृत्त झालेल्या आणि सध्या सेबी येथे स्मार्ट ट्रेनर म्हणून कार्यरत असणाऱ्या प्रदीप मून सरांनी विविध विषयांवर संवाद करून मुलांना बोलते करून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात मार्गदर्शन केले.आपण जास्तीत जास्त मार्क्स कसे स्कोअर करू शकतो याचा कानमंत्र दिला. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांनी पुस्तक, पुष्पगुच्छ आणि जॉय मेडल देऊन त्यांचे स्वागत केले.शाळेचे मुख्याध्यापक मधुकर पोर्लेकर, आणि शिक्षक वृंद, तसेच पदाधिकारी किशोर साळवी आणि जॉय चे चंद्रशेखर सावंत, सुनील चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.शिक्षक राजापकर यांनी मून सर आणि उपस्थितांचे शाळेच्या वतीने आभार मानले.




ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक निर्माते प्रकाश भेंडे यांना
भावपूर्ण श्रद्धांजली

## युद्ध होणार की नाही? महापूर की भूकंप? कसं असेल हवामान; उद्या भेंडवळची मांडणी भाकितांकडे लक्ष

जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ येथे अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर उद्या ३० एप्रिल रोजी सायंकाळी घटमांडणी करण्यात येणार आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर भेंडवळ येथे होणाऱ्या पारंपरिक घटमांडणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गेली ३५० वर्षे वाघ परिवार ही घटमांडणी करत आहे. या घटमांडणीच्या दुसऱ्या दिवशी वर्तवलेल्या भाकितांचे महत्त्व अनमोल मानले जाते. यावर्षी युद्ध, महापूर आणि हवामानाची स्थिती कशी असेल? याबाबतचे भाकीत या घटमांडणीत वर्तवले जाणार आहे. याकडे केवळ शेतकरीच नव्हे, तर सामान्य नागरिक आणि प्रशासनाचेही लक्ष लागलेले आहे. जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ येथे अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर घटमांडणी होणार आहे. वाघ परिवाराने 350 वर्षांपासून जपलेल्या परंपरेनुसार दुसऱ्या दिवशी म्हणजेच १ मे रोजी सूर्योदयाच्या वेळी या घटामध्ये रात्रभर झालेल्या बदलांवरून भविष्य वर्तवले जाईल. या भाकितामध्ये प्रामुख्याने शेती, पीक, पर्जन्यमान, देशाचे संरक्षण आणि राजकीय परिस्थिती यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर अंदाज व्यक्त केले जातात. भेंडवळच्या वाघ कुटुंबाने सुरू केलेली ही परंपरा आजही त्यांचे वंशज चंद्रभान महाराज वाघ यांनी अखंडपणे सुरू ठेवली आहे.

भाकीत ऐकण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता भेंडवळच्या घटमांडणीत शेती आणि अर्थव्यवस्थेशी संबंधित भाकितांबरोबरच नैसर्गिक आपत्ती आणि राजकीय घडामोडींविषयीही अंदाज वर्तवले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून या भाकित अचूक आहेत. लोकांचा या परंपरेवर दृढ विश्वास आहे. त्यामुळेच उद्या संध्याकाळच्या घटमांडणीनंतर १ मे रोजी सूर्योदयापूर्वी होणारे भाकीत ऐकण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष या घटमांडणीचे भाकीत बहुतांश वेळा खरे ठरते. त्यामुळे शेतकरी आणि कृषी क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी हा वार्षिक अंदाज नेहमीच उत्सुकतेचा विषय असतो. यासोबतच, राजकीय भाकित ऐकण्यासाठी राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांचीही मोठी गर्दी येथे होत असते. यावर्षी बदलत्या हवामानाचा विविध क्षेत्रांवर कसा परिणाम होणार, याबाबतचे भाकीत काय असेल, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# शिक्षक भरतीसाठी मंत्रालयात आंदोलन, थेट आत्मदहनाचा इशारा; प्रमुख मागण्या काय?

शिक्षक भरती प्रक्रियेतील विविध मागण्यांसाठी आज मंत्रालयात आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्या शिक्षकांना अडवल्याचे पाहायला मिळाले. यामुळे मंत्रालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर आंदोलकांकडून मागण्या मान्य न झाल्यास आत्मदहन करु असा इशारा दिला. आम्ही गरीब कुटुंबातील असून शिक्षक भरतीसाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न करत आहेत. मात्र, शासनाने त्यांना फसवले आहे, असा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

यावेळी काही आंदोलकांनी यावर प्रतिक्रिया दिली. "आम्ही कुठून पैसे भरणार? आम्ही गोरगरीब घरातले आहोत. पैसे कुठून आणायचे? जिल्हा परिषदही जागा देत नाही. आम्ही दोन वर्षांपासून शिक्षक भरतीसाठी प्रयत्न करत आहोत. पण आम्हाला शासनाने फसवलं आहे. यात आम्हाला मुख्यमंत्री मदत करू शकतात. त्यामुळे आम्ही इथे आलो. जर आज आम्हाला मुख्यमंत्र्यांनी मदत केली नाही, तर आम्ही आत्मदहन करणार. आमचा जीव संपवणार, कारण या शासनाने आम्हाला रस्त्यावर झोपण्याची वेळ आणली आहे. आज आम्हाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे." अशी एका आंदोलनकर्त्याने प्रतिक्रिया दिली. प्रमुख मागण्या



काय? १) जिल्हा परिषदांच्या १० टक्के पद कपात केलेल्या जागा तात्काळ पवित्र पोर्टलवर जाहिरात करून भरण्यात याव्यात. २) रिक्त, अपात्र आणि गैरहजर राहिलेल्या जागाही जाहिरातीत समाविष्ट करून चालू भरती प्रक्रिया पुढे सुरू ठेवावी. ३) पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रियेसाठी प्राधान्यक्रम (प्रेफरन्स) भरण्याची मुदत वाढवावी. ४) चालू दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरती केवळ २०२२-२३ च्या संच मान्यतेनुसार करून जिल्हा परिषदांच्या जागा याच टप्प्यात देण्यात याव्यात. आंदोलक काय म्हणाले? जर आमच्या मागण्या तातडीने मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही आत्मदहन करु आणि रस्त्यावर आपले जीवन संपवू. "आमच्या रक्ताच्या थेंबांवर हा अन्याय लिहिला जाईल. आज तुम्ही जर ऐकलं नाही, तर उद्या तुमच्या हृदयात फक्त पश्चात्ताप राहील. एक शिक्षक घडवणं म्हणजे एक पिढी घडवणं असतं... आणि आज तुम्ही तीच पिढी गमावत आहात." असे शिक्षक भरतीसाठी आलेल्या आंदोलकांनी म्हटले. मंत्रालयाच्या परिसरात तणावाचे वातावरण याबद्दल शासनाने सहानुभूतीपूर्वक आणि गांभीर्याने याबद्दलच्या मागणीचा विचार करावा. जिल्हा परिषदेच्या पहिल्या टप्प्यात कपात केलेल्या १० टक्के तसेच रिक्त, अपात्र आणि गैरहजर जागा पूर्ण क्षमतेने सध्याच्या चालू भरती प्रक्रियेत समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. जेणेकरून त्यांना त्यांच्या हक्काची नोकरी मिळू शकेल. या आंदोलनामुळे मंत्रालयाच्या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com